SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE : EPBX - 2609000 GRAM : UNISHIVAJI FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स - २६९००० संलग्नता टी-२ विभाग विस्तारित दुरध्वनी - २६०९०९१/९२
Accredited by NACC 2009 संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय दूरध्वनी: (थेट) ०२३१ -२६०९०६९

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/पदवी-पदव्युत्तर/आरजीसी/ No 2907 दि. 28 JUN 2013

विद्यापरिषद विषय क्र. (२०३)
दि. १४ व १५ मे, २०१३

प्रति,
मा. प्राचार्य,
वैभव शिक्षण संस्थेचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.),
सुळकाई रोड, हणमंतनगर, विटा,
ता. खानापूर, जि. सांगली.

**विषय :- आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या जून, २०१३ पासूनच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरण व अटीबाबत.**

**संदर्भ :- आपला जा. क्र. ५७५/२०१२ दि. ३०/१०/२०१२ चा प्रस्ताव.**
**(पाठयक्रम :- नुतनीकरण - बी.एड्. (संपूर्ण अभ्यासक्रम) )**

महोदय,

आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०१३ पासून संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासंदर्भात उपरोक्त अभ्यासक्रमाचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. या अभ्यासक्रमांना विद्यापीठाने खालील अटी पूर्ततेच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | बी.एड्. (संपूर्ण अभ्यासक्रम) | जून २०१३ पासून जून २०१४ पर्यंत एक (०१) वर्षासाठी |

**स्थानिक चौकशी समितीने खालील अटी आपल्या अहवालात नमूद केलेल्या आहेत.**

**अटी-**

**अ. शैक्षणिक बाबी विषयी -**

१. मराठी, इंग्रजी, भूगोल या अध्यापन पध्दतीचे सहा. प्राध्यापक व ग्रंथपाल यांची रितसर विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड करावी.

**ब. भौतिकसुविधा विषयी -**

१. ग्रंथालयामध्ये नविन पुस्तके(पेपर क्र. १ ते ६) रु. १५०००/- ची खरेदी करावी.
२. अग्निशामक व्यवस्था अद्यावत करावी.

**क. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांविषयी -**

१. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या शिक्षकांना ६ वा वेतन आयोग चालू करावा.
२. PF नाही. आयकर नियमितपणे जमा केला जातो.
३. व्याख्यान कक्षामध्ये लाऊड स्पिकर व्यवस्था करावी.

...२

**ड. वैधानिक समित्यांच्या कार्याविषयी -**

१. शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा भविष्यनिर्वाह निधी सुरु करावा.
२. विकास निधी समिती स्थापन करावी.
३. अंतर्गत दर्जा हमी कक्ष स्थापना करावी.

**फ. अध्यापनपूरक/ अध्यापनेतर कामाविषयी -**

१. विद्यार्थी निवडणुक व विद्यार्थी संसद मंडळ अहवाल ठेवावेत.
२. वैधानिक समितीचे कामकाज अद्यावत ठेवावे.

**छाननी समितीच्या अटी संदर्भातील शिफारसी - निरंक**

**उपरोक्त अटींव्यतिरिक्त यापूर्वीच्या अटींच्या पूर्ततेसंदर्भातील कार्यवाही प्रलंबित असल्यास त्या अटींची पूर्तताही त्वरीत करावी.**

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने आपल्या महाविद्यालयाचे सदरचे संलग्नीकरण हे तात्पुरता स्वरुपाचे आहे.अटींची पूर्तता झाल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणास मान्यता दिली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

सबब उपरोक्त सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतिसह अटीपूर्तता अहवाल या कार्यालयास सत्वर पाठवावा

**तसेच नुतनीकरणाच्या मान्यतेचा उपरोक्त कालावधी लक्षात घेऊन पुढील नुतनीकरणाचा प्रस्ताव विहीत शुल्कासह या कार्यालयास मुदतीत पाठविण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रत :-** १. पात्रता विभाग, २. इतर परीक्षा विभाग - ३, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग ५. संलग्नता टी-१ विभाग. ६. विशेष कक्ष विभाग

सत्यप्रत
प्राचार्य,
वैभव शिक्षण संस्थेचे
कॉलेज ऑफ एज्युकेशन(B.Ed.)
विटा,ता.खानापूर,जि.सांगली